CNR NO - MHCH090002382024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०५.०३.२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | ०५.०३.२०२४ |
| निकाल दिनांक | : | २०.०६.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०२ ०३ १५ |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गोंडपिपरी यांचे न्यायालय, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर

(पिठासीन अधिकारी यु. पी. शिंदे)

सं.फौ.प्र.क्र. १८०/२०२४ निशाणी क्र.२६

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन गोंडपिपरी,
ता. गोंडपिपरी जिल्हा. चंद्रपूर ....अभियोगपक्ष

-विरुध्द-

भाग्यवान हनुमंतु राऊत,
वय- ३३ वर्षे, व्यवसाय – मजुरी
रा. अडेगाव, ता. गोंडपिपरी,
जि. चंद्रपूर

......आरोपी

गुन्हाः महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५**(ई)** अन्वये

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ - श्री. आर.बी.धात्रक
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री. एम.एस.शेख

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक २० जुन, २०२६ रोजी)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**०२.** प्रस्तुत प्रकरणात गु.र.क्र./२६/२०२४ पोलीस स्टेशन, गोंडपिपरी ता. गोंडपिपरी येथे नोंदवून तपास श्री. वंदीराम पाल यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदवीले व आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०३. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.क्र.०६ वर नोंदविला. आरोपीने

प्रतिकथन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. २४/०१/२०२४ रोजी १८.०० ते १८.३० वाजताचे दरम्यान मौजा अडेगाव, ता. गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर येथे आरोपी याचे ताब्यात १० नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट संत्रा देशी दारू विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असतांना मिळून आली ? | नाही |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

<u>का र ण मि मां सा</u>

०५. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे पंच सा.क्र.१ दामोधर भगवान राऊत, फिर्यादी सा.क्र.२ नंदकिशोर वासुदेव माहुरकर व तपासी अधिकारी सा.क्र. ३ वंदीराम देवाजी पाल यांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेऊन त्यांचा साक्षपुरावा नोंदविण्यास असमर्थ ठरला. करीता, <u>नि.क्र.१</u> वर आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :-

०७. साक्षदार क्र.१ दामोधर भगवान राऊत हे पंच साक्षिदार असून त्यांनी सरतपासादरम्यान पोलीसांनी घटनास्थळावर त्यांच्या समक्ष पंचनामे तयार केलेले असल्याचे कथन केलेले आहे. परंतु, त्यांनी उलटतपासादरम्यान ते अडेगाव गावचे पोलीस पाटील असल्याचे मान्य केले आहे. तसेच, ते पोलीस पाटील असल्यामुळे पोलीसांचे त्यांच्या घरी नेहमी येणे जाणे चालु असल्याचे, पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यांनी अनेक कागदावर सह्या करत असल्याचे, पोलीस त्यांच्याकडे आले त्यांनी त्यांची सही घेतल्याचे, पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यांनी सही केल्याचे व त्यांना पंचनाम्याबाबत काही माहिती नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यामुळे पोलीसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा तयार केला होता, ही बाब त्यांच्या साक्षेवर संशय निर्माण करणारी आहे.

०८. साक्षदार क्र.२ नंदकिशोर वासुदेव माहुरकर यांना फिर्यादी या नात्याने

तपासण्यात आलेले असून, त्यांनी घटनेच्या वेळी पंचांसमक्ष आरोपीच्या ताब्यातून दारू जप्त केल्याचे कथन केलेले आहे. तद्वतच, त्यांनी रासायनिक पृथःकरणाकरीता सिलबंद केलेल्या नमून्याचे पुढे काय केले, याबाबत कोणतेही कथन त्यांच्या पुराव्यादरम्यान केलेले नाही. त्यामुळे त्यांचा साक्षपुरावा हा संशयापलीकडे नाही.

**०९.** साक्षदार क्र.३ वंदीराम देवाजी पाल तपास अधिकारी यांना तपासी अधिकारी या नात्याने तपासण्यात आलेले असून, त्यांनी पुराव्यादरम्यान साक्षिदारांचे बयाण नोंदविले असल्याचे व दोषारोपपत्र दाखल केल्याच्या बाबी कथन केलेल्या आहेत. त्यामुळे, त्यांचा साक्षपुरावा हा त्यांच्या कर्तव्यास अनुसरून असलेला दिसून येतो. करीता, त्यांच्या साक्षपुरावा हा आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता पुरेसा नाही.

**१०.** अभिलेखावरील साक्षीदारांच्या साक्षेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पंच साक्षिदार सा.क्र.१ दामोधर हे नेहमीचे साक्षीदार असल्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केला ही बाब संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे घटनास्थळ व जप्त पंचनामे पुर्णपणे सिद्ध झाले असे म्हणता येणार नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ:करणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारूच होती ही बाब सिद्ध झालेली आहे. परंतु, अभियोग पक्षाने केमिकल ॲनालायजर यांना तपासून सी.ए. रिपोर्ट सिद्ध केलेला नाही. त्यामुळे सदरचा सी.ए. रिपोर्ट हा सदरहू दारू ही आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केल्याबाबतचाच होता, ही बाब पुराव्याअभावी सिद्ध होऊ शकली नाही. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपी हे स्वतःजवळ अवैधरित्या दारू बाळगून असतांना मिळून आले होते, ही बाब सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे, असे मत नोंदवून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :-**

**११.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

आदेश

१. आरोपी भाग्यवान हनुमंतु राऊत यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एकुण १० नग प्रत्येकी ९० मि.ली. रॉकेट संत्रा देशी दारू विल्हेवाटीकरीता आवाहनाचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर येथे पाठविण्यात यावी.

**३.** आरोपीचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

**४.** आरोपीने रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र देऊन फौजदारी प्रकिया संहिता चे कलम ४३७-अ अन्वये पुर्तता करावी.

**(**न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला**.**)

(Sd-)
**(उमाकांत पी. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
गोंडपिपरी

स्थळ :- गोंडपिपरी
दिनांक :- २०/०६/२०२६

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | उमेश रामप्रसाद आमटे, लघुलेखक श्रेणी-३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, गोंडपिपरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | २०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | २०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | २०/०६/२०२६ |